**MAHA VITARAN**

**Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.**

संचालक (वित्त)/ १९३३ / १०३६५ दिनांक - २५/०३/२०१४

## परिपत्रक

**विषय : बाह्यस्त्रोत कर्मचारी व सल्लागार यांच्यावर होणा-या खर्चावरील नियंत्रणाबाबत.**

संदर्भ : १) संचालक (वित्त)/मराविविकं मर्यादित/५९२२ दिनांक २६/०२/२०१३
२) संचालक (वित्त)/मराविविकं मर्यादित/वित्त/५९२१ दिनांक ०८/११/२०१२.

वरील संदर्भित परिपत्रक क्रमांक १ अन्वये खर्चावरील नियंत्रणासाठीच्या उपाययोजना याबाबत मार्गदर्शक तत्वासह सविस्तर निर्देश देण्यात आले आहेत.

उपरोक्त संदर्भित परिपत्रकांमध्ये बाह्यस्त्रोत कर्मचारी व विविध सल्लागार यांचेकडून केलेल्या कामांबाबतच्या खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी परिमंडळ कार्यालय पातळीवर खर्च नियंत्रण समितीची स्थापना करुन मुख्य अभियंता यांच्या मासिक बैठकीमध्ये आढावा घेण्याचे सूचित करण्यात आले होते. परंतु याबाबतीत क्षेत्रिय कार्यालय स्तरावर अपेक्षित कार्यवाही झाल्याचे आढळून येत नाही. दरम्यान नवीन लेखा सहाय्यकांची नियुक्ती झालेली असल्यामुळे असा निर्णय घेण्यात आला आहे की, खालीलकामांसाठी कुठल्याही प्रकारचे बाह्यस्त्रोत कंत्राट दिनांक ०१/०७/२०१४ नंतर देण्यात येऊ नयेत.

१) FABC Data Punching
२) Taxation Matters -- Hiring of Consultant Services for Filing TDS/ Service Tax Returns, Preparation of MVAT information etc.
३) Bank Reconciliation
४) Hiring of Manpower such as Office Assistants, Peons in Accounts / GAD & Technical Section.

आर्थिक वर्ष २०१३-१४ मध्ये बाह्यस्त्रोत कर्मचा-यांवर तसेच सल्लागार यांना देण्यात आलेल्या मानधनावर झालेल्या खर्चाचा तपशील सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये दिनांक १५/०४/२०१४ पर्यंत मुख्य कार्यालय मुख्य महाव्यवस्थापक (सां.वि.) यांच्याकडे पाठविण्यात यावा जेणेकरुन याबाबतीत मुख्यालय स्तरावर आढावा घेण्यात येईल.

दिनांक ०१/०७/२०१४ नंतर ज्या कार्यालयांना बाह्यस्त्रोत व्दारे काम करण्याची निकड असेल अशा कार्यालयांनी परिमंडळातर्फे योग्य स्पष्टीकरण देऊन मुख्य कार्यालयाकडे प्रस्ताव पाठवावा व प्रस्ताव मंजूर झाल्यानंतरच बाह्यस्त्रोत काम देण्यात यावे.

वरील सर्व निर्देशांचे काटेकोरपणे अनुपालन करण्याची जबाबदारी कार्यालय प्रमुखाची राहील. वरील सूचनांचे पालन करताना कुठल्याही प्रकारची शिथिलता आढळल्यास संबंधित अधिकारी / कर्मचारी कंपनीच्या नियमानुसार शिस्तभंग कार्यवाहीस पात्र राहील.

सदरचे परिपत्रक महावितरणच्या संकेत स्थळावर (www.mahadiscom.in) उपलब्ध आहे.

सोबत : प्रपत्र

**संचालक (वित्त)**

**प्रत सस्नेह रवाना :**
संचालक (संचलन), महावितरण, मुंबई

**प्रती :**
१) प्रादेशिक कार्यकारी संचालक - १/२/३.
२) सर्व मुख्य अभियंता परिमंडळ.
३) सर्व अधिक्षक अभियंता सं व सु मंडळ कार्यालये.

# INFORMATION IN RESPECT OF OUTSOURCED AGENCIES

Name of Circle :

Month :

| Name of the Division | Nature of Outsourcing work | Name of Outsouricng Agency | Details of order given | Amount of Order (Rs.) | Order given through Quotation/Tender | Period of work for which the order is given | Whether the order is completed to the satisfaction of MSEDCL | Whether order given Reapetative/Renewed | No. of orders given | Reasons of Outsourcing | Performance of the Outsource Agency |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |